# KNOWLEDGE RESONANCE

ISSN : 2231-1629
A HALF YEARLY PEER
REVIEWED REASERCH JOURNAL
(Evaluated in the SJIF Journal Masters List Evaluating Process with Impact Factor of 8.072 for Year 2021 )

A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal




Vol 10 No.2 July-Dec. 2021

Research Journal Publication Committee
Dr. M. K. Umathe College, Nagpur

# CONTENTS

| Sr. No. | Topic | Page No. |
|---|---|---|
| 1. | Impact of Covid 19 From Legal Perspective<br>Prof. Neha Kothari*, Dr. Pramila D'Souza** | 01 |
| 2. | Various Services Provided by Libraries During Covid – 19<br>Dr. Manohar Kedar | 09 |
| 3. | Comparative Analysis of Customer Satisfaction from Organized and Unorganized Retail Market<br>Seema. P. Malve | 11 |
| 4. | Public Revenue and Tax Administration of Acharya Kautilya<br>Dr. Hemraj D. Choudhari | 16 |
| 5. | Determinants of Intellectual Management and Sustainable Development as A Challenge and Way of Forward<br>Dr.(MRS). Satinder Kaur Gujral | 18 |
| 6. | Feminism: Rebuilding The Image of Women in Indian Fiction<br>Dr. Aachal Mundafale | 23 |
| 7. | Historical Consciousness and A Reading of Amitav Ghosh's The Hungry Tide<br>Ms. Sarika Deshpande | 25 |
| 8. | A Sociological Study of Dhangar Community in Western Maharashtra<br>Mr. Abhijit Abaso Patil | 29 |
| 9. | Work of Devraai in Environmental Protection: A Case Study<br>Satish Dhanawade | 32 |
| 10. | The Term Femicide: A Global Problem Faced in The Era<br>Ku. Lumbini Haridas Ganvir | 35 |
| 11. | Relevance of Gandhian Thought in Globalization Era: Impact of Mahatma Gandhi's Education Policy on New National Education Policy-2020<br>Dr. Vinod L. Sonawane | 38 |
| 12. | Rationale Behind Bank Recapitalization<br>Dr. Hemlata Namdev Kavare | 42 |
| 13. | Dalit Women: Poverty, Gender and Caste-Based Discrimination in India<br>Varsha R. Bhujbal | 47 |
| 14. | Agriculture and Climate Change in Maharashtra<br>Dr. Sujata Shende | 50 |
| 15. | Social Impacts of Sez On Farmers of Shendra Region<br>Dr. Manjusha Motiram Nalgirkar | 53 |
| 16. | Critical Analysis of Challenges & Problems of Women Administrators<br>Sangeeta Pandit Rajapurkar | 57 |
| 17. | Emerging Trends of E-Commerce in India<br>Dr. Munde Sanjeevani Dashrathrao | 61 |
| 18. | Evaluation of Vidwan Expert Database with Special Reference to Maharashtra<br>Dr. Manisha R. Khakre | 66 |

19. महाराष्ट्र में वृध्दाश्रमों में रहने वाले वृध्दों की आयु संबंधी बीमारियों की स्थिती 72
डॉ. राजेंद्र बगाटे
20. गोंदिया जिल्हे के मागासवर्गिय जनसंख्या का चिकित्सक अध्ययन 80
डॉ. बी. के. जैन
21. 'मोहन राकेश' तथा 'निर्मल वर्मा' की कहानियों में अकेलेपन का चित्रण 84
डॉ. बालाजी जोकरे
22. डफला जमातींचे समाजशास्त्रीय अध्ययन 87
डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर)
23. महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता–भारतातील सार्वजनिक व्यवस्था व भ्रष्टाचाराच्या विशेष संदर्भात 91
डॉ. विकास वैजिनाथ टाचले
24. उमरेड तालूक्याच्या ग्रामीण समुदायातील धर्मांतरित बौध्द समुदायाची शैक्षणिक स्थिती 94
डॉ.रमेश एम. घोनमोडे
25. कलम 370 नंतरचे जम्मू काश्मीर 98
प्रा. लक्ष्मन बाबाराव यादव
26. नौकरी करणाऱ्या विवाहीत स्त्रियांवर कोरोना–19 विषाणुचा झालेला मानसिक, शारीरिक, आर्थिक परीणाम व समस्या 101
प्रा. अनिल रा. गावंडे*, प्रा. डॉ. श्याम एस. खंडारे**
27. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्याचे योगदान 103
नितीन उध्दवराव जाधव
28. बंजारा समाजातील स्त्रीयांची संस्कृती आणि बदल 106
प्रा. डॉ. उल्हास एन. राठोड
29. वृद्धावस्थाः चाहूल आणि जागरूकता 109
डॉ. कविता आर. बोरकर
30. सेवानिवृत्त ज्येष्ठ स्त्रियांना निवृत्तीनंतर येणाऱ्या मानसिक समायोजन समस्यांचे अध्ययन 112
लक्ष्मी सीताराम डाखोळे
31. साठोत्तरी मराठी ग्रामीण कथासाहित्य 115
डॉ. मधुकर वि. नंदनवार
32. कोव्हिड–19 चा असंघटीत क्षेत्र व स्थलांतरीत कामगारांवरील परिणामः एक दृष्टीक्षेप 119
डॉ. सुनिल शिंदे
33. अनुवादीत कादंबरीतील मर्म 122
प्रा. रिता वाळके (डंभाळे)
34. गांधीवादी विकास प्रतिमानः एक विश्लेषणात्मक अध्ययन 124
डॉ. डी. डी. भोसले
35. सरकारी कंपन्याच्या खाजगीकरणाचा परिणाम 127
डॉ. सुधीर सुरेश ढोरे
36. कोविड–19: भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांसमोरील आव्हाने आणि संधी 130
डॉ. एकता मेनकुदळ
37. भार प्रशिक्षण कार्यक्रमाचा 10 मी. एअर रायफल नेमबाजांच्या क्रीडा कार्यमानावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास 133
डॉ. मोहित राजेंद्र शिंदे*, अमिता स्वप्निल चेन्नापट्टन**, सौ. पूनम मोहित शिंदे***
38. भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील आव्हाने 137
डॉ. अरूण महादेव राख

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

**IMPACT FACTOR 8.072**

July – December 2021- Vol. 10 No. 2

# साठोत्तरी मराठी ग्रामीण कथासाहित्य

**डॉ. मधुकर वि. नंदनवार**

*भिवापूर महाविद्यालय भिवापूर, जि. नागपूर.*

***सारांश :–***

*भारतीय मानवाचे कथाप्रिय मन हे एक महत्वाचे वैशिष्टये होय. प्राचीन काळापासून मानवाला कथा ऐकण्याची व सांगण्याची आवड आहे आजही ती परंपरेने चालू असून ग्रामीण भागातील कथेची आरंभीची प्रेरणा ही जीवनातील वास्तववादी अनुभूतीतून निर्माण झालेली आहे. 'गुजगोष्टी' या लघुकथेपासून सुरु झालेला कथेचा पसारा आज खूप व्यापक झाला आहे. मराठी साहित्यात कथा वाङ्मयाचा इतिहास लक्षणिय असून वेगवेगळ्या कलाखंडात कथा विकसित होत गेलेल्या आहेत. खऱ्या अर्थाने 1970–75 मध्ये खेड्यापाड्यातून नवशिक्षितांचा फार मोठा वर्ग निर्माण होऊ लागला. दळणवळणाची साधने वाढली. शहरी जीवनाशी संपर्क वाढला आणि इतर काही कारणामुळे ग्रामीण जीवन पूर्णतः बदलू लागले. सुधारणेच्या नावाखाली खेडी ओस पडायला लागल्याचे दिसते. अनेक सहकारी संस्था साखर कारखाने ग्रामीण परिसरात जन्माला आली परंतु त्याचबरोबर शोषितांचा एक वर्ग समाजजिवनात तयार झाला. हळुहळु सुशिक्षित बेकारांचे प्रमाण वाढत गेले. तरूणांमध्ये असंतोष खदखदत राहिला. या अन्यायाची चीड 1970 नंतर ग्रामीण साहित्यात व्यक्त होऊ लागली. ग्रामीण वाचक वर्ग वाढू लागला. ग्रामीणांचे जीवन कथाविश्वाने व्यापले. ग्रामीण कथा साहित्याने अनेक कथालेखकांची पीढी निर्माण केली व त्यातून खरे ग्रामीण कथाविश्व उगम पावले. खरे तर 1980 नंतर ग्रामीण माणसाच्या व्यथा–वेदनांना, शोषणाला नेमकेपणाने शब्दबध्द करणारी गंभीर कथा लिहिल्या जाऊ लागली. या ग्रामीण कथावि" वात कथाकारांनी महत्वाचे योगदान दिले आहे. या कथाकारांनी त्यांच्या कथासाहित्यातून ग्रामीण जीवनाचे अस्सल प्रतिबिंब पाडले त्यांचे जीवनमुल्ये साकार झाले अशा ग्रामीण जीवनाच्या कथासाहित्याचा हा थोडक्यात घेतलेला परामर्ष.*

*आजच्या ग्रामीण मराठी कथाविश्वाचा प्रारंभ आनंद यादव यांच्या मते हरिभाऊ आपटे यांची 'काळ' तर मोठा कठीण आला' या कथेत सापडते. 1960च्या सुमारास एक नवे युगपरिवर्तन झाले आणि ग्रामीण मराठी कथा ही अनेक वेगवेगळ्या प्रेरणांनी लिहिली जाऊ लागली. आजतागायत कमी अधिक फरकाने विस्तारत गेलेली ग्रामीण कथा व्यंकटेश माडगूळकरांनी विकसित केली. ग्रामीण कथेला वेगळे परिणाम दिले. ग्रामीण कथेचे खरे रूप माडगूळकरांच्या कथेत सापडते. या कथाकारासोबतच शंकर पाटील, द.मा. मिरासदार, उध्दव शेळके, आनंद यादव, सखा कलाल, रा.रं. बोराडे, बाबा पाटील, प्रतिमा इंगोले, चंद्रकांत वानखेडे, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, राजन ठोकळ, सुरेश जाधव यांनी ग्रामीण कथाविश्व समृध्द व संपन्न केले.*

**व्यंकटेश माडगूळकर** :– माडगूळकरांच्या कथेचा रचनाबंध सहजसोपा काळजाला भिडणारा. माडगुळकरांनी अद्भूतरम्यतेच्या पातळीवरून कथेला वास्तव पातळीवर आणले. माडगुळकरांनी नव्याने ताज्या स्वरुपात आणि यथार्थपणे ग्रामीण जीवनदर्शन घडविले. नवकथाकार असल्यामुळे रूढ कथेचे साचे नाकारुन मराठी कथेला त्यांनी नवा रूपबंद बहाल केला. माडगूळकरांची जीवन जाणीव पाटील, कुणबी, माळी या कृषिव्यवसायातील बलुतेदारांत न अडकता गावकुसाबाहेरील भटक्या विमुक्तांच्या भणंग जगण्याचे प्रत्ययकारी चित्रण करते. तर दुसरीकडे ग्रामीण जीवनात होणाऱ्या परिवर्तनाचाही मागोवा घेते. एक वेगळाच धुंद करणारा अनुभव ते व्यक्त करतात. ग्रामजीवनातील दु:ख हे तर माडगूळकरांच्या लेखनाचे केंद्रस्थान आहे.

**शंकर पाटील** :–सुप्रसिध्द मराठी कथाकार शंकर बाबाजी पाटील हे ग्रामीण स्त्रीच्या दु:खाचा समर्थपणे वेध घेणारे कथाकार होत. 'वळीव' ते 'ऊन' पर्यंतच्या प्रत्येक कथा संग्रहांना महाराष्ट्र राज्याची पारितोषिके प्राप्त असणारे प्रसिध्द कथाकार आहेत. यांच्या कथेतील स्त्री स्वत:साठी जगत नाही ती दुसऱ्यासाठी जगते. हालअपेष्ठा भोगते स्वतःच्या सुखाकडे पाठ फिरविते आणि कुटुंबाला आधार देते. 'भुजंग', 'वेणा' या कथा याची साक्ष देतात. शंकर पाटील यांनी ग्रामीण कथेला वाङ्मयीन दृष्ट्या अधिक संस्कारीत केले. त्यात भावपूर्णता व नाट्यमयता आणली. मानसाच्या स्वभावाचे मर्म ओळखून कथा कशी रंगवत न्यायची आणि श्रोत्यावरील व वाचकावरील पकड कशी घट्ट ठेवायची या क्लृप्त्या शंकर पाटलांना अवगत आहेत हे विषेश. 'नाटक' ही कथा अशीच रंगतदार व वैशिष्टयपूर्ण आहे.

**द. मा. मिरासदार** :–यांनी ग्रामीण कथेला एक वेगळीच दिशा दाखविली. मिरासदारांची कथा विनोदाच्या अंगाने जीवनदर्शन घडवते. शुध्द ग्रामीण विनोदी कथा मिरासदार यांनीच लिहिली. धूर्त, कावेबाज, चालाख अशी पात्रे त्यांच्या कथांमध्ये आढळतात. त्यांच्या कथा या वाचकांचे हास्य टिकवून ठेवण्याचे कार्य करतात. वाचकाचे निखळ मनोरंजन करतात. मिरासदारांच्या कथेने मराठी ग्रामीण कथेला विनोदाचे नवे परिमाण मिळवून दिले आहे. या कथाकारांनी ग्रामीण कथेला मराठी कथेच्या मुख्य प्रवाहात मिळवून देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. कथाकथनाचे कार्यक्रम घेऊन ग्रामीणकथा महाराश्ट्रात कोसोदूर पोहचविली. त्यामुळे या कथांना दूरपर्यंतचा मोठा वाचक वर्ग मिळाला हे त्यांच्या कथेचे गमक होय.

**आनंद यादव** :– सामाजिक वातावरणात आनंद यादवांची फार मोठी पकड असल्यामुळे त्यांच्या कथा खरोखरच सामाजिक वाटतात. ग्रामीण बोलीचा ते लयबध्दतेने व योग्यवेळी उपयोग करतात. 'खळाळ' 'मातीखालची माती'

हे आनंद यादवांचे गाजलेले कथासंग्रह. 'उखडलेली झाडे' या कथासंग्रहात व्यथा वेदनांचे चित्रण येते तर खेड्यातील सर्व स्तरात पोहचलेले राजकारण ते मोठ्या खुशीने व रंजकतेने मांडतात. 1970 नंतर ग्रामीण चळवळ उभी राहिली. ग्रामीण साहित्याची संम्मेलने होऊ लागली, मेळावे–शिबीरे यातून विचारविनिमय होऊ लागले. आनंद यादवांच्या पीढीत ग्रामीण कथा चहुबाजूंनी विकसित झाली हे सत्य आहे.

**रा.र. बोराडे** :–यांनी मराठवाड्यातील ग्रामीण जीवन रेखाटले आहे. खेड्यातील दैन्य, भूक, उपासमार, बेकारी, भोतकऱ्याच्या व्यथा बोराडे आपल्या कथांमधून रंगवतात. ग्रामीण जीवनातील नातेसंबंधाचे वर्णन बोराडे आपल्या ताकदीने करतात. 'नातीगोती', 'बोळवण' हे कथासंग्रह उल्लेखनीय आहेत. काही बालमनाच्या कथाही रा.र. बोराडे यांनी लिहिल्या असून 'राखण', 'खोप' 'लगीन' या कथा गरीब शेतमजुरांच्या मुलांच्या कथा आहेत. 'खड्डा' या कथेतून वृध्दांच्या व्यथा साकारतात. 'ताळमेळ' या कथेत विनोदाला भरपूर वाव दिलेला आहे. त्यांना ग्रामीण वास्तवाची चांगली जाण आहे.

**उध्दव शेळके** :– यांच्या कथांमधून वऱ्हाड व विदर्भाचा परिसर साकार झाला आहे. त्यांच्या 'शिळान' 'वानगी' या कथासंग्रहातून त्यांनी ग्रामीणांचे चित्र रंगविले आणि वाचकांना अंतर्मुख केले. वऱ्हाडी बोलीचा उत्तम उपयोग केला. त्यामुळेच त्यांची कथा वाचकांच्या मनात घर करते. 'गरीबा घरची लेक' हा कथासंग्रह याच धर्तीवरचा असून महत्वाचा आहे.

**रत्नाकर मतकरी** :–यांच्या 'गूढकथा' हा स्वातंत्र्योत्तर कथेतील एक नवा प्रवाह आहे. त्यांच्या गूढकथा मानवी मनाच्या तळाशी जाऊन वेध घेतात. यांची 'खेकडा' ही पहिली गूढकथा आहे. यातून मानवी जीवनाचे व व्यक्तिमनाचे वास्तव, त्यात अपरिहार्यपणे जडलेले कारूण्य दाखवताना जे असाह्य आहे त्यांच्याविशयी सहानूभूती मतकरी व्यक्त करतात. त्यांची 'हडळ' ही कथा समाजात अठराविश्व दारिद्र्य असल्याचे सूचक आहे.

**सखा कलाल** :– सखा कलालांची कथा मनोविश्लेषना च्या अंगाने प्रवास करते. त्यांच्या 'ढग' या कथासंग्रहाला दिलेले नाव समर्पक आहे. खेडूत माणसाची असणारी ढग ही पहिली कथा. कलाल हे दुःखाच्या कहाण्या विणतात, हे दुःख भोगणारी माणसे खेडूत असली तरी त्यांच्या दुःखाची जात थोडी वेगळी आहे. कलाल आपल्या कथेत ग्रामीण निसर्ग, ग्रामीण बोली, ग्रामीण परिसर यांचा सतत वापर करतात. त्यामुळे त्यांची कथाही मुळातच मानवी कथा असते.

**बाबा पाटील** :– ग्रामीण व्यक्तींचे वृध्दत्व, त्यांची सश्रध्व मने, त्यांची संभ्रमीत मने यांचे चित्रण बाबा पाटील प्रभावीपणे रंगवितात. ग्रामीण परिसरापेक्षा ते ग्रामीण मानसाच्या मनाचा निश्चितपणाने वेध घेतात हे त्यांच्या कथेचे महत्वाचे वैशिष्टय होय.

**चारूता सागर**:– अगदी मोजकेच कथालेखन करूनही वाचकाच्या हृदयात स्थान मिळविले. त्यांचे 'नागीन', 'नदिपार', 'मामाचावाडा' हे बहुचर्चित कथासंग्रह होत. मोजक्या पण कसदार कथा त्यांनी मराठी वाचकांना दिल्या. अतिशय वेगळे जीवन जगलेल्या ह्या लेखकाचे खरे नाव 'दिनकर दत्तात्रय भोसले' असे आहे. लहानपणीच घर सोडले वणवण भटकंती केली. वयवर्श 14 ते 26 भटकत राहीले. त्यांनी जाती–संस्काराच्या मर्यादा केव्हाच ओलांडल्या. जीवन जगतांना आलेले समग्रानुभव त्यांच्या कथेत उतरले आहेत. आशयाच्या दृष्टीने उपेक्षित वर्गाचे आणि अभिव्यक्तिच्या दृष्टीने कलात्मक असे दर्शन घडवण्याचे काम चारूता सागर यांनी केले. 'दर्शन' या अप्रतिम कथेत लेखकाने जोगतीनीचे उभे आयुष्य रेखाटले आहे. त्यांची भाषा आशयाच्या अभिव्यक्तिसाठी अनुरुप आहे. 'डोंबारी', 'नंदिवाले', 'गारूडी', पारधी अशा भटक्या जमातीचे वर्णन त्यांच्या कथांमधून वि" ोशत्वाने येते.

**महादेव मोरे**:– ग्रामीण कथेच्या परिघाबाहेर असलेले जग मोरे यांनी आपल्या कथेत रंगवले. मोटारड्रायव्हर, क्लिनर, वेल्डर, मेहतर, वेश्या यांचे दुःख व त्यांच्या समस्या कथेचा विषय झाले. 'चित्राक' या मोरेंच्या कथासंग्रहात थोडा भडकपणा व उत्तानपणा दिसून येतो.

**भास्कर चंदनशिव** :–चंदनशिवांना कथेत दुःखद भावना जवळची असल्याचे दिसते. जीवनातील वेगवेगळया अवस्थांचे ते चित्रण करतात. ग्रामीण भाषा आणि प्रतिमा वापरून पात्रांच्या मनात खोलवर उतरण्याचे सामर्थ्य यांच्या लेखनात स्पष्टपणे दिसते.

**नागनाथ कोतापल्ले**:– यांच्या कथेत ग्रामीण अनुभवाबरोबर इतर विषयही तितक्याच तिव्रतेने मांडले गेले आहेत.

**रंगनाथ पठारे**:– औद्योगिक संस्कृतीतील नवी जीवनपध्दती त्यांच्या कथेत उतरते. अर्धशहरी, अर्धग्रामीण अशा तालुक्यासारखी लहान गावे त्यांच्या चिंतनाचा विषय बनतात. 'सटाना ते सटाणा' आणि 'न्युजस्टोरी' या कथा प्रखरतेने सामाजिक भाष्य करणाऱ्या आहेत. जीवनविशयक सुंदरस्वप्न मनाशी बाळगुन एक पदविधर नोकरीला येतो. पण परिस्थितीमुळे सर्वतत्व बाजुला ठेऊन त्याला तडजोड करावी लागते आणि स्वतःचे एका बधीर दांभिक प्राध्यापकात रूपांतर करावे लागते. 'न्युजस्टोरी' कथा पत्ररूपाने उलगडत जाते.

**प्रतिमा इंगोले** :– ग्रामीण कथाक्षेत्रात स्त्रीकथाकारांची संख्या कमी आहे. प्रतिमा इंगोले ग्रामीण कथा क्षेत्रातील सन्मान्य असे व्यक्मित्व आहे. अस्सल वऱ्हाडी ग्रामीण कथाकार म्हणून त्या पुढे आल्या. 'लेकभुईची' हा त्यांचा कथासंग्रह वऱ्हाडी बोलीच्या ठसकेदार वापरामुळे लक्षणीय ठरला. प्रादेशिक म्हणी, वाक्प्रचारामुळे त्यांच्या कथा नाट्यमय वाटतात. खेडी शहरामागे धावत आहेत आणि शहर पैशामागे धावत आहे. त्यातच नवतरूण फरफटतो आहे. नात्यांमधील ओलावा झपाट्याने नष्ट होत आहे. हे त्यांच्या कथांचे केंद्रबिज, त्यांच्या कथेतील व्यक्तिचित्रण ठसठसीत असतात. संवादाचा प्रभावी वापर हे त्यांच्या कथेचे वैशिष्टये. 'भोंड' या कथेत तर लेखनाची सारी सामर्थ्ये एकवटलेली दिसतात. त्यांची कथा स्त्रीभोवती फिरत असली तरी पुरूषाविषयी आक्रस्ताळेपणा मात्र दिसत

नाही. 'अक्षदीचे दाने' 'हजारी बेलपान' हे त्यांचे निखळ वऱ्हाडी बोलीतील कथासंग्रह आहे.

**राजन गवस** :– यांच्या कथा देवदासीच्या जीवनावरील वास्तव बाजु मांडतात. या ग्रामीण कथाकाराचे बालपण खेड्याशी संबंधीत असल्यामुळे खेड्याचे परिवर्तन त्यांनी अनुभवले आणि म्हणूनच प्रखरतेने ते मांडू ' াकले.

**बाबुराव मुसळे** :– ग्रामीण जीवनातील विविध अनूभव सूक्ष्म आणि अनेकपदरी स्वरूपात त्यांनी हाताळले. 'मोहोरलेला चंद्र' कथेत जन्मापासून दुःखामागे लागलेल्या पायरूपी व्यथा ते मांडतात. कथेतील छोटी छोटी पात्रे स्वतःची वैशिष्टये घेवून साकारतात. त्यामुळेच त्यांची कथा मनात रेंगाळत राहते हे विशेष.

**चंद्रकांत वानखेडे** :– यांनी आपल्या कथेतून आलेले विविध अनुभव तीव्रपणे आवि" कृत केले. वानखेडे यांच्या 'विटाळ' मधील कथा दलित जाणीवेची ग्रामीण कथा आहे. या कथेतून मांग–महार माणसे मराठी कथेत अवतरली आहेत. मांग–महार आणि दलितेतर प्रस्थापित यांच्या संबंधाचे गुंतागुंतीचे बहुरंगी नाट्य अत्यंत चित्रमय पध्दतीने कथेतून साकार होते. विटाळ कथेतून मांगीन स्त्रीचा मोरावाटा रेखाटला आहे. वानखेडे आपल्या कथांमधून समाजजीवनाचे भयान वास्तव साकार करतात त्यात ते यशस्वी झाले आहेत.

**सदानंद देशमुख** :– देशमुखांची कथा साधेपनाने साध्या घटना व प्रसंगातून उलघडत जाते. तरीही मनाची पकड घेते. 'अंधारबन' हा त्यांचा पहिला कथासंग्रह ग्रामीण मनाची कालवाकालव टिपण्याचा प्रयत्न देशमुख करतात. त्यामुळे त्यांची कथा आपोआपच कलात्मकतेच्या पातळीवर पोहोचते. 'उलंगवाडी' ही कथा तर सुरूवातीपासून शेवटपर्यंत नाट्यमय पध्दतीने रेखाटलेली आहे. ग्रामीण बोलीची लयही ते सांभाळतात. 'लचांड' हा त्यांचा दुसरा कथासंग्रह त्यातील 'भोगवटा' ही कथा खेड्यातून शिकून शहरात गेलेला पण खेड्याची नाळ न तुटलेला अशा मुलाचे चित्रण करते. 'कडकी' कुरण, कमाई अशा कथा लक्ष्यात राहतात. सदानंद देशमुखांच्या कथा लेखनाने ग्रामीण कथेच्या अशा पल्लवीत होतात. गावात शाळा, ग्राम पंचायत, बालवाडी, सोसायट्या, यंत्रे, दवाखाना आले पण गावाचे भकासपणा मात्र संपलेला नाही. याचे वास्तववादी दर्शन देशमुख आपल्या कथामध्ये रंगवतात. प्रतिक, प्रतिमा, प्रतिके, अलंकृतता यांच्या आहारी न जाता अनुभवाला एका कलात्मक पातळीवर अविश्कृत करण्याचे सदानंद देशमुख यांचे सामर्थ्य एकूण ग्रामीण कथेच्या कक्षा निश्चितच वाढविणारे आहे.

**सुरेश जाधव** :– यांचा माती हा कथासंग्रह प्रसिध्द आहे. त्यातून अस्सल ग्रामीण जीवनाचे चित्र त्यांनी साकार केले आहे.

**वासुदेव मुलाटे** :– यांनी मोजक्याच पण उत्कृष्ठ कथा लिहील्या आहेत. ग्रामीण भागातील शोषकांचा वर्ग हा त्यांच्या चिंतनाचा विषय. 'चाचरी' या कथेत ते प्रामाणिक कष्टाळू कोतवालाचे चित्रण करतात. त्यांच्या 'उबड' कोंडमारा, ओढ ह्या कथा उल्लेखनीय आहेत.

**गणेश धांगडे** :– यांच्या 'खोपा' 'सरण' या कथेत गरीबांच्या मरणापेक्षाही पैसा श्रेष्ठ कसा असतो याचे चित्रण त्यांच्या कथांमध्ये अवतरते व मन हेलावून टाकते.

**यु. म. पठाण, सुखराम हिवराळे, ग. ल.ठोकळ**:– या कथाकारांनी मोजक्याच पण दर्जेदार व श्रेष्ठ अशी कथानिर्मिती केलेली असून कथावि" वात आपले योगदान दिले आहे.

**ग्रामीण कथेची वैशिष्टये** :– ग्रामीण कथासाहित्याचा आढावा घेतांना ग्राम शब्दाचा अर्थ विचारात घ्यावा लागतो. ग्राम हा व्यापक शब्द आहे. त्यामुळे त्यात सर्व जाती–धर्माचा समावेश होतो. म्हणूनच महात्मा गांधी, महात्मा फुले, तुकाराम महाराजांचा वारसा सांगता येतो. ग्रामीण कथेची वैशिष्टये म्हणजे ग्रामीण कथेत नटवेपणा नाही. तिला प्रेक्षाकपणा भडकपणाचा सोस नाही. ग्रामीण कथाकार परिचित जीवनाविषयी लिहितो. त्यामुळेच ते हृदयाला भिडते. ग्रामीण मातीचा गंध त्यात दरवळतो. म्हणूनच त्यात अस्सलपणा जाणवतो. प्रादेशिक भाषेचे अलंकारामुळे ते अनुभव गोचर होतात. ग्रामीण कथा सर्वस्पर्शी सर्वगामी आहे. ग्रामीण कथेने ग्रामीण मुलुख जिवंत केला. जीवनाचे सुक्ष्मातीसुक्ष्म स्पंदने ग्रामीण कथा रंगवते. आजपर्यंत अनुलक्षित राहिलेला समाज त्यांच्या जीवनपध्दती तेथील माणूस कथेत उतरला तो वाचकाला भावला हे ग्रामीण कथेचे मोठेपण आहे हे विशेष. आज जागतिकीकरणाच्या बदलत्या काळात प्रत्येक शहरी माणसाच्या मनात एक गाव दबलेला आहे. ज्या मातीवर तो पोसला तो तिच्यावर जीवापाड प्रेम करतो. गाव सोडून शहरात आलो आणि माणसाच्या गर्दीत मिसळला गेलो याची खंत त्याला आहे. ह्या भावभावना ग्रामीण कथाकाराने आपल्या कथेत उतरवल्या. त्यामुळे ग्रामीण माणसाचा न्युनगंड कमी झाला. त्याचा आत्मिक भाव वाढला. ग्रामीण कथेने महाराष्ट्राचे सांस्कृतिक, वाङ्मयीन, सामाजिक प्रबोधन घडवून आणले आहे. कोणत्याही लेखकाला त्याच्या समाजापासून दूर करता येत नाही. तो समाजच त्याला लिहिता बोलता करीत असतो. ग्रामीण कथेत असाच कथाकार खऱ्या अर्थाने उतरला हे निश्चितपणे सत्य आहे.

**ग्रामीण कथेविषयी अपसमज**:– ग्रामीण कथेचा आढावा घेताना असे दिसते की, ग्रामीण कथेविषयी खूप अपसमज आहेत. ग्रामीण शब्दयोजना केली की, ग्रामीणकथा तयार होते. शेतमाती, वावर, मोट, नांगर, वखर, शेतमजूर, पीके शब्द आले म्हणजे ग्रामीण कथा होते. त्यांचे दारिद्रय, दुःख लिहीले की झाली ग्रामीणकथा असे मात्र नाही. वर उल्लेखिलेल्या सर्व कथाकारांनी या अपसमजुती पार धूवून काढल्या. 'तेथे पाहिजे जातीचे', 'येरा गबाळयाचे काम नव्हे' हे ग्रामीण कथाकारांनी दाखवून दिले.

**नव ग्रामीण संदर्भात अपेक्षा**:– ग्रामीण साहित्याच्या चळवळीने ग्रामीण लेखकांना एकत्र आणले. त्यांना प्रोत्साहन दिले. गेल्या पन्नास साठ वर्षात ग्रामीण कथा भरभराटीला आली. ग्रामीण कथा मुख्य प्रवाहाला मिळाली. मराठी कथेला आशयदृश्ट्या समृध्द केले. ग्रामीण साहित्याने कोणत्या जातीशी समुहाशी बांधून घेतले नाही.

म्हणून ग्रामीण कथा उंची गाठू शकली. कुटुंब व्यवस्था, शिक्षणसंस्था, राजकारण, धरणग्रस्तांचे प्रश्न, समाजातील अंधश्रध्दा, खालच्या जातीचे उपेक्षित जगणे अशा प्रश्नांना समग्रतेने कथेत घेण्याचा प्रयत्न ग्रामीण कथा करते. यापुढे कथाकारांना प्रतिभेला जागृत ठेवून बदलत्या काळाची बदलती रूपे कथेतून मांडावी लागतील हे तितकेच सत्य आहे.

**समारोपः–** आजच्या विज्ञान, तंत्रज्ञानाच्या विशेषतः इंटरनेटच्या काळात संपूर्ण ग्रामराज्य ओढल्या गेलेले आहे. मोबाईल लोकांच्या गळ्यातील ताईत बनला असून तो सर्वांची वस्तुतः गरज बनला आहे. रात्रीच्या जेवनाची सोय नसलेल्या ग्रामीण माणसाच्या हातात मोबाईल, तोंडात सुपारी आहे. अशा बदलत्या काळाचे बदलते चित्र लेखकांनी मांडायला हवे. जागतिकीकरणाने शहरच नव्हे तर ग्रामीण भाग होरपळून निघाले. शेतकरी हवालदिल झाला. त्याच्या आत्महत्या याचाच परिणाम होय. मुक्त अर्थव्यवस्थेने शेतकऱ्यांचा कणाच मोडला. खजगीकरण, आतंकवादाने भेडसावलेले जग, नक्षलवादाने घेतलेले बळी, कोरोनाची महामारी, असे कितीतरी नवे विषय ग्रामीणतेशी जुळलेले आहे. लेखकांनी याचे भान ठेवून आपली प्रतिभा फुलवत ठेवावी ही अपेक्षा. ग्रामीण कथेने यापूढे अधिक सर्वकष व्हावे. ग्रामजीवनाचे सर्व रंगतरंग कथेत आणावेत. नव्या दमाच्या कथाकारांनी ग्रामीण नवजाणीवा साकारण्यात विषयाचे साचलेपण कथेत उतरणार नाही याचे भान ठेवावे. आजपर्यंत ग्रामीण कथेने सौंदर्याबरोबरच बुध्दीची मशागत केली. ग्रामीण कथा वास्तववादाच्या व्यापक पातळीवर जाऊन कलात्मकतेचे भान ठेवते ही वस्तुस्थिती आहे. यापुढेही ग्रामीण कथा सर्वकष विचार व्यक्त करतील हीच अपेक्षा.

**संदर्भ ग्रंथ–**

1. *प्रदक्षिणा खंड पहिला, कॉन्टिनेन्टशन प्रकाशन, विजयानगर पुणे 30*
2. *साठोत्तरी मराठी वाङ्.मयातील प्रवाह, संपा. डॉ. शरणकुमार लिंबाळे, दिपराज प्रका.2007*
3. *ग्रामीण साहित्य आणि वास्तव, संपा. डॉ. कृश्णा इंगोले, स्नेहवर्धन प्रका. पुणे 2011*
4. *राष्ट्रीय पात्रता परीक्षा व राज्यस्तरीय पात्रता परीक्षा–पेपर–3, प्रा अक्षयानंद, पुणे.*
5. *ग्रामीण साहित्यः एक चिंतन डॉ. द. ता. भोसले, मनोविकास प्रकाशन, पुणे. 2009*